# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.07.2025** **वारःगुरुवार**

---

- भारत आणि ब्रिटन दरम्यान मुक्त व्यापार करारावर आज स्वाक्षरी होण्याची शक्यता
- संत नामदेव महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- ४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर
- जेष्ठ व्यंगचित्रकार शि.द.फडणीस यांच्या शंभरीनिमित्त पुण्यात तीन दिवसांचा भव्य महोत्सव आणि
- दिव्या देशमुख FIDE महिला विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

भारत आणि इंग्लंड धोरणात्मक संबंधांना नवी गती देण्यावर आज व्यापक चर्चा करण्याची अपेक्षा आहे. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांच्यासोबत द्विपक्षीय संबंधांवर व्यापक देवाण-घेवाण करतील. संरक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात द्विपक्षीय संबंध वाढवण्यासाठी पंतप्रधान मोदी काल रात्री दोन दिवसांच्या दौऱ्यावर ब्रिटनमध्ये पोहोचले. भारत-ब्रिटन मुक्त व्यापार कराराची औपचारिकता ही मोदी यांच्या दौऱ्याचा एक प्रमुख निष्कर्ष ठरणार आहे. वाणिज्य मंत्री पियुष गोयल आणि त्यांचे ब्रिटिश समकक्ष जोनाथन रेनॉल्ड्स दोन्ही पंतप्रधानांच्या उपस्थितीत FTA वर स्वाक्षरी करतील. तीन वर्षांच्या वाटाघाटींनंतर निश्चित झालेल्या या व्यापार करारामुळे सर्व क्षेत्रांमध्ये भारतीय वस्तूंसाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

**<u>संतनामदेव</u>**

समाजातल्या शेवटच्या व्यक्तीला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणाऱ्या आणि भागवत धर्माचा विचार आपल्या लेखणी आणि वाणीने देशभर पोहोचविणाऱ्या संत नामदेव महाराज यांच्या पंढरपूर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पंढरपूर इथं सांगितलं. श्री संत शिरोमणी नामदेव महाराज, परिवार आणि संत जनाबाई यांच्या षष्ठ शतकोत्तर संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. संत नामदेव महाराजांच्या समाधीस्थळी वैश्विक दर्जाचं स्मारक उभारतांना निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही.

त्यांचे विचार हे त्यांचं खरं स्मारक असून हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येतील, असंही ते म्हणाले. फडणवीस यांनी संत नामदेव पायरीचं दर्शन आणि पूजन केलं. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्याच्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली.

**<u>रक्तदानशिबीर</u>**

या संजीवन समाधी सोहळा निमित्तानं अहिल्यानगरच्या सावेडी भागातील नामदेव मंदिरात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. जिल्ह्यातील विविध शहरात आणि गावात संत नामदेव महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. तिसगाव इथं नामदेव शिंपी समाजाच्या वतीनं या सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं.

**<u>वॉका-हळदउत्पादकसंस्था</u>**

इंट्रो : राज्यातील पहिली " हळद उत्पादक महिला शेतकऱ्यांची सहकारी संस्था " हिंगोली जिल्ह्यात स्थापन होणार असून आत्तापर्यंत या अंतर्गत 300 महिला शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. ऐकुया याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

***Script***

***राज्यातील अशा प्रकारची ही पहिलीच सहकारी संस्था असून यातून हळदीचे ब्रॅण्डिंग करून विदेशातही हळद निर्यात करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन झालेल्या बचत गटांमध्ये हळद उत्पादक महिलांची संख्याही मोठी आहे. हळद उत्पादक महिलांचीच सहकारी संस्था स्थापन करून त्या मार्फत हळद खरेदी करून मोठ्या उद्योगाची उभारणी व्हावी. खरेदी केलेली हळद विदेशातही निर्यात केली जावी या उद्देशाने हा पुढाकार घेतला आहे. जीवनोन्नती अभियानाच्या जिल्हा परिषद गटनिहाय महिलांना खेळते भांडवल उपलब्ध करून दिले जाणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून खरेदी केलेली हळद प्रक्रिया करून टर्मॅक्स ब्रॅंड ने विक्री केली जाणार आहे. त्यामुळे या हिंगोलीच्या महिला संस्थेकडून हा ब्रॅंड विकसित होणार आहे. महिलांच्या अर्थकारणाला ही संस्था मोठी गती देणारी ठरणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.***

**<u>टिळक-पुरस्कार</u>**

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीनं देण्यात येणारा त्रेचाळिसावा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय रस्ते आणि भुपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉक्टर रोहित टिळक यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा केली. शुक्रवारी १ ऑगस्टला हा पुरस्कार गडकरी यांना पुण्यात प्रदान करण्यात येईल.

'लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशीचा स्वीकार करत गडकरी यांनी रस्त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत मोठे कार्य सुरू केले आहे. विविध प्रकारच्या वाहन निर्मितीत स्वदेशीचा पुरस्कार आणि प्रसार त्यांच्याकडून होत आहे. देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची ४३ व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असल्याचं डॉक्टर रोहित टिळक यांनी सांगितलं .

**<u>टिळकजयंती</u>**

"स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" या घोषणेचे प्रणेते, थोर नेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

**<u>इंट्रो-</u>**

ज्येष्ठ व्यंगचित्रकार शिवराम दत्तात्रय फडणीस २९ जुलैला वयाची शंभर वर्षे पूर्ण करीत आहेत. कलाविश्वासाठी हा एक मणिकांचन योग आहे. यानिमित्त वसुंधरा क्लब आणि कार्टूनिस्ट्स कम्बाइन यांच्याद्वारे पुण्यात शि. द. १०० हा तीन दिवसांचा भव्य महोत्सव 27 जुलैपासून आयोजित करण्यात आला आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

***<u>स्क्रिप्ट</u>***

***शिदंच्या व्यंगचित्रांचा आस्वाद आणि त्यातून बोध घेऊन अनेक पिढ्या संस्कारित झाल्या. त्यांच्या व्यंगचित्रांमुळं चित्रकला सामान्यांपर्यंत पोहोचण्यास मदत झाली. 1951 मध्ये हंस मासिकात त्यांचं पहिलं व्यंगचित्र प्रकाशित झालं. ठसठशीत, आणि लयबद्ध शैली, समाजातील विसंगती टिपणारे प्रसंग, त्यातून निर्विष आणि सुखावणारी विनोदनिर्मिती याचा वस्तुपाठ शिदंनी घालून दिला. त्यांच्या शब्दरहित बोलक्या चित्रांनी नियतकालिकांची मुखपृष्ठं, पुलंसारख्या दिग्गज लेखकांच्या कलाकृती सजल्या. रंगरेषांचे चौकार आणि षटकार मारणाऱ्या या कालजयी धन्याला मानवंदना म्हणून आयोजित या महोत्सवात व्यंगचित्रांचं प्रदर्शन, हसरी गॅलरी, बालगंधर्व कलादालनात भरणार आहे. इथेच दररोज व्यंगचित्रविषयक विविध कार्यक्रम होणार आहेत. याखेरीज महाराष्ट्राच्या हास्यरेषा, शिदः कला आणि कल्पना, शब्दांवाचून, असे कार्यक्रम, डिजीटल कार्टून प्रात्यक्षिक आणि मंगळवारी 29 जुलैला शिदंचा नागरी सत्कार सोहळा असे भरगच्च कार्यक्रम होणार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी नीतीन जळूकर याच्यासह संध्या खान, पुणे.***

**<u>मुंबईविद्यापीठ-मासावकर-संध्या</u>**

मुंबई विद्यापीठ आणि रशियामधील मॉस्को स्टेट विद्यापीठ यांच्यात विविध शैक्षणिक आणि संशोधन उपक्रमांसाठी असलेल्या कराराअंतर्गत इनोप्राक्तिका मॉस्को स्टेट विद्यापीठानं मुंबई विद्यापीठाला दिलेल्या ३० लाखांच्या अनुदानातून विद्यापीठात उच्च दर्जाचे ई-कंटेंट स्टुडिओ आणि ऑडिटोरिअम तयार करण्यात आले आहेत. या स्टुडिओच्या मदतीनं शिक्षक प्रशिक्षणामध्ये आमुलाग्र बदल घडू शकेल आणि विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक आशय वृद्धीसाठी याचा मोठा फायदा होईल.

**<u>आयटीआय</u>**

गेल्या काही वर्षात राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची म्हणजे आयटीआय ची अवस्था बिकट झाली आहे. या व्यवसायिक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढविण्यासाठी विविध शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु करुन वर्षभरात आयटीआयला ऊर्जितावस्था आणणार असल्याचं कौशल्य, रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल सातारा इथं पत्रकार परिषदेत बोलताना सांगितलं. आयटीआयमध्ये कंत्राटी शिक्षक आणि इतर कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी करण्याबाबत लवकरच धोरण आखणार असल्याचंही ते म्हणाले.

**<u>एलएस मीडिया</u>**

भारतात दीड लाखांहून अधिक प्रकाशनं आणि ९०८ खासगी दूरचित्रवाणी असल्याची माहिती, काल लोकसभेत माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी दिली. प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाकडे नोंदणीकृत प्रकाशनांची संख्या २०१४-१५ मध्ये १ लाख होती ती, २०२४-२५ मध्ये दीड लाखांवर गेली आहे. खासगी उपग्रह दूरचित्रवाणी वाहिन्यांची संख्या देखील वाढून २०२४-२५ मध्ये ९०८ झाली आहे. आजपर्यंत, डीडी फ्री डिशवर ९२ खासगी वाहिन्या आणि ५० दूरदर्शन वाहिन्या उपलब्ध आहेत. प्रसार भारतीच्या जाळ्याचा देशभरात विस्तार ही एक निरंतर प्रक्रिया असल्याचंही मंत्र्यांनी सांगितलं.

**<u>इथेनॉल मिश्रण</u>**

भारतानं पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचं २० टक्के लक्ष्य गाठल असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. स्वच्छ ऊर्जेच्या वापरामुळं १ लाख ३६ हजार कोटी रुपयांची परकीय चलन बचत झाली आहे. यामुळं शेतकऱ्यांना १ लाख १८ हजार कोटी रुपये मिळाले आहेत आणि ६९८ लाख टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी झालं आहे अशी माहिती त्यांनी दिली.

**<u>निधन</u>**

पुणे फेस्टिव्हलचे विश्वस्त रवींद्रनाथ सुरेंद्रनाथ दुर्वे यांचं काल वृद्धापकाळामुळं निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते. नवोदित कलाकारांना हक्काचं व्यासपीठ मिळवून देण्यासाठी त्यांनी विशेष कार्यक्रम आयोजित केले. पुण्यातील गानवर्धन संस्थेचे सचिव आणि महाराष्ट्र विद्या मंडळाचे ते माजी अध्यक्ष होते.

**<u>क्रिकेट</u>**

भारत-इंग्लंड पुरुषांच्या क्रिकेट कसोटी मालिकेत चौथ्या सामन्यात पहिल्या दिवशी भारतानं ४ बाद २६४ अशी आश्वासक सुरुवात केली. साई सुदर्शननं ६१ तर यशस्वी जयस्वालनं ५८ धावा केल्या. रवींद्र जडेजा आणि शार्दुल ठाकूर आज खेळ पुढे सुरु करतील. यजमान संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्विकारलं.

**<u>बुद्धिबळ</u>**

भारताच्या दिव्या देशमुखनं काल जॉर्जियातील बाटुमी इथं आयोजित FIDE महिला विश्वचषक स्पर्धेत चीनच्या टॅन झोंगीला हरवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केलं. या विजयामुळं, दिव्यानं २०२६ मध्ये होणाऱ्या कॅंडिडेट्स स्पर्धेत स्थान मिळवलं तसंच पहिला ग्रँड मास्टर निकषही पूर्ण केला. १९ वर्षीय दिव्या FIDE महिला विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली. कोनेरू हम्पी आणि चीनच्या लेई टिंगजी यांनी सलग दुसऱ्यांदा बरोबरी साधली, आज त्यांच्यात टायब्रेक सामना होईल.

**<u>पाऊस</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात दोन दिवसांपासून पाऊस पडत असून, २२ तारखेपासून पावसाचा जोर वाढला आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाचा तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकणात किनारपट्टीलगत सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**